


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.११ जुलै २०२५

## सर्वात मोठी बातमी! जनसुरक्षा विधेयक महाराष्ट्र विधानसभेत मंजूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** जनसुरक्षा विधेयक विधानसभेत एकताने मंजूर करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मांडलं. या विधेयकावरुन सभागृहात चर्चा झाली. यानंतर आवाजी मतदान पद्धतीने मतदान पार पडलं.

यानंतर जनसुरक्षा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. विधानसभेनंतर आता विधान परिषदेत हे विधेयक मांडलं जाईल. विधान परिषदेत विधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यपालांच्या अंतिम स्वाक्षरीनंतर या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होईल. शहरी नक्षलवाद नियंत्रणात आणण्यासाठी हा कायदा राज्यात लागू करण्यात येत आहे. हा कायदा कुठल्याही डाव्या विचारांच्या, संघटनांच्या किंवा पक्षाच्या विरोधात नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.



देशातील काही राज्यांमध्ये मागच्या काळात मोठ्या प्रमाणात नक्षलग्रस्त झाले आहेत. माओवाद विचाराने प्रेरित होऊन अनेकजण सुरुवातीच्या काळात बंदूका हातात घेऊन व्यवस्थेच्या विरोधात लढायचे. भारतीय संविधानाने जी व्यवस्था उभी केली आहे ती आम्हाला मान्य नाही. आम्हाला साम्यवादी व्यवस्था उभी करायची आहे, अशा प्रकारच्या विचारातून या संघटना निर्माण झाल्या. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारने काम केलं. यामुळे हा माओवाद हळूहळू संपुष्टात यायला लागला. महाराष्ट्रात केवळ दोन तालुक्यात माओवाद सक्रीय दिसत आहेत. पण आगामी काळात तो देखील राहणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

असं असलं तरी त्याचवेळी त्याचं दुसरं स्वरुप सुरु झालं. त्यातून मोठ्या प्रमाणात संघटना बनवण्यात आली. त्या संघटनांचं नाव पाहिल्यावर लोकशाही वाचवण्यासाठी सुरु केल्याचा भास होतो. पण तसं नाही. त्या संघटना भारताचं संविधान मानत नाहीत. त्यामुळे भारतीय कम्युनिस्ट माओवादी ही संघटना बॅन आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आपल्या लोकांचा जे लोक ब्रेनवॉश करत आहेत त्यांच्यावर कारवाई करणं ही काळाची गरज आहे. त्यामुळे आपण हा कायदा करत आहोत. कुठल्याही पत्रकार, राजकीय नेत्यावर कारवाई करता येत नाही. ज्याच्यावर कारवाई होईल ती न्यायाधीशांच्या आदेशानुसार होते. देशाच्या व्यवस्थेवर घाला घालणाऱ्या लोकांविरोधात कडक कारवाई करावीच लागते, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. महाराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी हा कायदा आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितलं.

## अहिल्यानगर - कल्याण राष्ट्रीय महामार्ग बनला मृत्यूचा सापळा !



### आज खासदार निलेश लंके उपोषणाला बसणार...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** अहिल्यानगर - कल्याण राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक २२२) हा महामार्ग डांबरीकरणाऐवजी आता सिमेंट काँक्रीटचा केला जात आहे. महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील अहिल्यानगर ते टाकळी ढोकेश्वर - पारनेर तालुका हद्द या ५० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामाला गेल्या महिन्यापासून वेगाने बनत असताना मृत्यूचा सापळा बनला आहे. ठेकेदाराच्या चुकीच्या धोरणामुळे दररोज मोठी वाहतूक कोंडी होते.

त्यामुळे दररोज अपघातांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. प्राप्त माहितीनुसार पारनेर पोलिस स्टेशन हद्दीमध्ये आतापर्यंत १२ जणांनी जीव गमावला असून २५ ते ३० जण अपघातत जखमी झाले आहेत. खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी जबाबदार असणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत खासदार निलेश लंके यांनीसुद्धा या रस्त्याच्या कामासंदर्भात नाराजी व्यक्त केली असून अपघातांचे प्रमाण वाढले असल्याकारणाने ते सुद्धा ११ जुलै रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे खासदार निलेश लंके उपोषणाला बसणार आहेत. मुळात चांगल्या स्थितीत असलेल्या या रस्त्याला रस्त्याला दुरुस्तीची गरजच का? भासली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण असल्याचे अनेक प्रवाशांचे म्हणणे आहे. रस्त्याचे काम होत असताना वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर होते. वाहानांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. ज्या साईड पट्ट्याचे काम सुरू आहे. तेथून पर्यायी वाहतूक व्यवस्था करून देणे ही कंपनीची जबाबदारी असते, मात्र रात्र असो की दिवस कंपनीचे कर्मचारी हायवेवर दिसत नाहीत. त्यामुळे वाहनचालकांचे प्रचंड हाल होत आहे. अधिकृत मिळालेल्या माहितीनुसार चुकीच्या दिशा फलकामुळे तसेच चुकीचे डिव्हायडर दिल्यामुळे तसेच चूकीचे गतीरोधक दिल्यामुळे अपघात होऊन एक महिनाभरात १२ ते १५ जणांना आपला जीव यामध्ये गमावला लागला आहे. काम पूर्ण झालेल्या रस्त्याच्या बाजूला टोकदार लोखंडी गज आडवे लावलेले असून, काही ठिकाणी अरुंद पुल, दुसऱ्या बाजूला खोल गटारे आणि अरुंद रस्ता, सिमेंट काँक्रीटीरण करत असताना त्यामध्ये वापरले जाणारे मटेरियल निकृष्ट दर्जाचे आहे. याचे प्ररिक्षण हायवेच्या अधिकृत इंजिनिअर लोकांनी करावे असे देखील सर्वसामान्य प्रवाशांची करत आहेत. नियमानुसार सहा किलोमीटर अंतरामध्ये पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे हे ठेकेदाराचे काय आहे.

मात्र, २० ते २५ किलोमीटर एकसाईड वाहतूक सुरू असल्याने एकाच पट्ट्यावर वाहनांची वाहतूक सुरू असल्याने प्रचंड गर्दी होते आहे. भाळवणी, ढवळपूरी फाटा ते वाघवाडी फाटा, धोत्रे, ढोकी फाटा, तिखोल फाटा, टाकळी ढोकेश्वर बायपास रोड या ठिकाणी दररोज वाहातूक कोंडी होते त्यामुळे अहमदनगर शहत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रचंड हाल होत आहेत.

महामार्ग पोलिस व स्थानिक पारनेर व टाकळी ढोकेश्वर पोलीसांनी यासंदर्भात कंपनीवर कोणतीही ठोस कारवाई केली नाहीतर लोकशाहीच्या माध्यमातून कंपनी विरोधात आंदोलनाचा इशारा खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी दिलेल्या प्रसिद्धीस पत्रकात म्हटले आहे.

### पुण्याच्या 'टी अँड टी' कंपनीवर कारवाई करू - बाळासाहेब खिलारी



या रस्त्याच्या निर्मितीसाठी पुण्याच्या 'टी अँड टी' या कंपनीला जबाबदारी देण्यात आली आहे. या महामार्गासाठी केंद्र सरकारच्या वतीने २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ह्या सिमेंट काँक्रीटीचा रस्ता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मदतीने सुरू आहे. सद काँक्रीटीकरणाची दुसरी लेण सुरू असून,पहिली लेण ही दुसऱ्या दिशेने जाणाऱ्या वाहनांकरता अपूर्ण पडत आहे. एका बाजूने फक्त चार फूटाचा डांबरी रस्ता उरलेला असून सहा फूटाचा रोड मूरुम मातीचा आहे. ज्यावेळी त्यावर गाड्या जातात त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या वाहनांना प्रचंड धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सिमेंट काँक्रीटीकरण झालेल्या सिमेंट मध्ये काही गज आडवे लावलेले असून ते गज रात्री मोटार सायकल स्वारांच्या पायाला लागत असून ते जखमी होत आहेत. तसेच काही वाहानांच्या टायरचे सुद्धा प्रचंड नुकसान होत आहे. राष्ट्रीय महामार्ग ६१ यांनी त्वरित यामध्ये लक्ष घालून त्या ठिकाणी चांगला रस्ता बनवावा अशी मागणी होत आहे. तसेच सिमेंट काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्यावर चांगले रिफ्लेक्टर व रात्रीच्या वेळी वाहनांना दिसेल असे रेडियम लावण्याची मागणी वाहन धारक प्रवाशी करत आहेत. सदर रस्त्यामध्ये साईड पट्ट्याच्या कामामध्ये जो मुरुम वापरण्यात येणार आहे त्या ठिकाणी तो दररोज वापर व्हावा अशी मागणी होत आहे.

पारनेर पोलिस स्टेशन हद्दीमध्ये आतापर्यंत १० ते १५ अपघात होऊन हजारो लोकांचे संसार प्रपंच यामध्ये उध्वस्त झाले आहेत. मोठ्या थाटात वसूल केला जाणारा टोल यामुळे वाहतूक करणारे प्रवासी वैतागून गेले आहे. अपघात होणे म्हणजे जणू नित्याचाच दिनक्रम बनला आहे. याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप होत आहे. खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, संबंधित पुण्याच्या टी अँड टी कंपनीचा ठेकेदार आणि हायवे प्रशासनाने ठोस कारवाई करावी, अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी दिला आहे.

## डांबर प्लांट येरवडा धुळीच्या विळख्यात ! काँग्रेसच्या 'टाळा ठोको आंदोलनात' जनआक्रोशाचा उद्रेक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, पुणे :** येरवडा परिसरातील डांबर प्लांटमुळे नागरिकांचे आरोग्य गंभीर संकटात आले असून, दिवसेंदिवस वाढणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे आजार, त्वचाविकार, कॅन्सर आणि इतर गंभीर रोगांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहर काँग्रेस (आय) कमिटी आणि वडगावशेरी विधानसभा मतदार संघ मतदार संघाच्या वतीने जोरदार टाळा ठोको आंदोलन करण्यात आले.




या आंदोलनादरम्यान येरवड्यातील डांबर प्लांटच्या प्रवेशद्वारावर टाळे ठोकण्यात आले आणि 'आरोग्यासाठी संघर्ष अटळ' अशा घोषणा देत निषेध नोंदवण्यात आला. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते डॅनियल लांडगे, विल्सन चंदवळे, नागेश भालेराव, माजी नगरसेवक संतोष आरडे, अश्विनी लांडगे, रमेश सकट, विजय आल्हाट, तसेच परिसरातील धूळ व प्रदूषणामुळे त्रस्त असलेल्या महिलांची व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. डांबर प्लांटमुळे घरात, पाण्यात व जेवणात काळसर धूळ मिसळत असून श्वसनाच्या तक्रारी, सततचा खोकला, डोळ्यांची जळजळ, यामुळे लहान मुले आणि वृद्ध नागरिक हैराण झाले आहेत. या धुळीचा आरोग्यावर झालेला दुष्परिणाम इतका गंभीर आहे की काही नागरिकांनी टीबी, अस्थमा, व कॅन्सरसारख्या आजारांवर उपचार सुरू केल्याचे सांगितले. काँग्रेसने प्रशासनाला इशारा दिला की, जर तातडीने डांबर प्लांट बंद करण्यात आला नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करू असा इशारा देण्यात आला.

## थोडक्यात

### गटविकास अधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर वंचित बहुजन आघाडीच्या उपोषणाची सांगता



**अक्षराज : उध्दव आटोळे**

**दि.१०, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील मौजे किन्ही येथील गोरगरीब मागासवर्गीय लोकांना, सध्या राहतात त्याच ठिकाणी घरकुलाचा लाभ द्या. तसेच मौजे शारा येथील ई क्लास गट नंबर ३२६ मधील व्यापारी प्रयोजनासाठी केलेले अनधिकृत अतिक्रमण हटवा. या मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे दिनांक ७/७/२०२५ पासून पंचायत समिती लोणार समोर आमरण उपोषण सुरू आहे.

सविस्तर वृत्त असे की, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीने मौजे शारा येथील गट नंबर ३२६ मध्ये व्यापारी प्रयोजनासाठी केलेले अनधिकृत अतिक्रमण हटविण्यासाठी तहसीलदार साहेब लोणार यांना निवेदन दिले असता महसूल विभागाने कागदी घोडे नाचवून धन दांडग्यांवर कोणतीही कारवाई न करता वेळ काढू पणा केला. सदर ठिकाणी विनापरवाना संबंधित अतिक्रमणधारक यांनी अंदाजे ७००-८०० ब्रास मुरूम उत्खनन केले. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन-तीन महिन्यांचा कालावधीनंतर ७२ ब्रास मुरूम उत्खनन केल्याचा खोटा अहवाल सादर केला. एकीकडे दोन दांडगे यांच्या घशात लाखो रुपयांची संपत्ती जात असताना महसूल प्रशासन आणि पंचायत समिती प्रशासन आमच्या निवेदनाची दखल घेऊन कुठलीही ठोस कारवाई करत नाही. तर दुसरीकडे सर्वसामान्य, भूमिहीन, गोरगरीब ब लोकांच्या घरामध्ये पाणी साचत असताना देखील नियम, व शर्तीदाखून त्यांना घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात येत आहे.

सदर मागणी घेऊन भाई महिंद्र पनाड यांच्या नेतृत्वात युवा अध्यक्ष गौतम गवई आणि युवा महासचिव पवन भाऊ अवसरमोल यांनी दिनांक ७ जुलै २०२५ पासून आमदान उपोषण प्रारंभ केले होते. दिनांक ८ जुलै २०२५ रोजी सदर उपोषणाची गंभीर दखल घेऊन गटविकास अधिकारी उमेश देशमुख यांच्याशी चर्चा झाली असता त्यांनी किन्ही येथील घरकुलासाठी गावठाण हद्द वाढीचा प्रस्ताव ग्रामसचिव दळवी यांना ७ दिवसांमध्ये सादर करण्यास सांगितले. गावठाण हद्द वाढीच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करून संबंधितांना घरकुलाचा लाभ देण्याचे आश्वासित केले.

तसेच शारा येथील अनधिकृत अतिक्रमण निष्काशीत करण्याचे व कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचारी, अधिकारी यांना निलंबित करण्याचे लेखी आश्वासन दिले. गटविकास अधिकारी यांनी तसे लेखी पत्र देऊन मागण्या मान्य केल्यामुळे आमरण उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी भाई महेंद्र पनाड यांच्यासह रामप्रसाद मुंडे विस्तार अधिकारी, रामेश्वर शिंदे शाखा अभियंता, शिवप्रसाद कायंदे सरपंच किन्ही, श्याम दळवी ग्रामसचिव किन्ही, निलेश चव्हाण, मालती ताई कळंबे, रमेश प्रधान, सचिन देहाडे, प्रताप भालेराव सरपंच सरस्वती, अँड अशोक अवसरमोल, अँड लहाने, संदीप लहाने, दीपक दत्ताराम अंभोरे, रोहन अंभोरे, रोशन अंभोरे, शुभम अवसरमोल, प्रवीण शिवाजी मोरे उपसरपंच गायखेड, छाया वानखेडे, श्रावण मस्के, लता शेरे, सयाबाई खरात, राजेश लहाने, संगम मोरे, रतन वानखेडे, पुनम निकाळजे यांच्यासह तमाम वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### पोंभूर्णा येथे केंद्राची पहिली शिक्षण परिषद संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** पंचायत समिती पोंभूर्णा अंतर्गत पोंभूर्णा केंद्राची पहिली शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विकासनगर येथे संपन्न झाली. शिक्षण परिषदेचे उद्घाटक म्हणून धनराज आवारी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पोंभूर्णा अध्यक्ष भाऊराव झाडे मुख्याध्यापक पोंभूर्णा, प्रमुख मार्गदर्शक सुरेश वासेकर केंद्रप्रमुख, प्रमुख अतिथी सुधाकर कन्नाके गुणाकार जुमनाके, विकास गणवीर उपस्थित होते. शाळेतील लहान विद्यार्थ्यांनी सुमधुर स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे उद्घाटक धनराज आवारी गटशिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी समर्पित भावनेने कार्य करावे. तसेच शैक्षणिक कामकाज करताना येणाऱ्या अडचणी एकमेकांच्या सहकार्याने सोडवाव्यात असे विचार व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शक सुरेश वासेकर केंद्रप्रमुख यांनी शाळा स्तरावर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे. विद्यार्थ्यांची उच्चतम गुणवत्ता पातळी वाढविण्यासाठी जोमाने प्रयत्न करावे, असे विचार मांडले. रेणुका धनोरे मॅडम सुलभक यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर याविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच शैक्षणिक साहित्यातून अध्यापन पद्धती समजावून सांगितले. विनोद बावणे यांनी नवोदय विद्यालय व शिष्यवृत्ती परीक्षा प्रश्नसंच तसेच झटपट उत्तरे सोडवण्याची पद्धती संबंधाने मार्गदर्शन केले. गिरीधर कोडापे यांनी शैक्षणिक साहित्याचा वापर करून वाचन क्षमता विकसीत करण्यासंबंधाने मार्गदर्शन केले. कु.संध्या बाहे मुख्याध्यापिका यांनी शाळा विकासाची यशोगाथा पीपीटी च्या माध्यमातून दाखविले. केंद्रांतर्गत निपुण शाळा करण्यासाठी विशेष योगदान देणाऱ्या प्रत्येक शाळेतील सर्व शिक्षकांना मोमेंटो व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवर व्यक्तींनी सुद्धा यथोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशाल मडावी यांनी केले. तर आभार प्रदर्शन लीलावती खापणे मुख्याध्यापिका विकास नगर यांनी मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संपादकीय

### चॅटिंग : संवादाची नवी भाषा

'व्हाट्सअॅप' हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तयार झाल्यानंतर लोक तोंडाने बोलण्यापेक्षा टाइप केलेल्या शब्दांनी आणि इमोजींनी अधिक संवाद साधू लागले. भावना आणि विचार व्यक्त करण्याची ही एक नवी पद्धत माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात उदयास आली. संप्रेषणाच्या या नव्या माध्यमामुळे लोक दूर असूनही एकमेकांशी भावनिक संबंध निर्माण करू लागले. खरं सांगायचं तर, टाइप केलेले शब्द आणि वाक्यरचना या तोंडी बोलण्यापेक्षा अधिक प्रभावी ठरत असतात . मानवाने संवाद साधण्याची सुरुवात केल्यापासून आजच्या चॅटिंगपर्यंतचा प्रवास लाखो वर्षांचा आहे. गुहांमध्ये कोरलेली चित्रलिपी आजच्या इमोजीच्या स्वरूपात पुन्हा जन्माला आली आहे, असं म्हणावंसं वाटतं.

आज चॅटिंग हे काहींसाठी कामाचा भाग बनले आहे, तर काहींसाठी ते विरंगुळ्याचं साधन ठरले आहे. 'चॅटिंग'चा मराठीत अर्थ 'गप्पा मारणे' असा होतो. पूर्वी लोक पारावर, मंदिराच्या कट्ट्यावर एकत्र येऊन पान-सुपारी खात, तंबाखू मळत मळत गप्पांचे फड रंगवत. आज तेच गप्पांचे फड चहाच्या कॅन्टीनवर, रेल्वे प्रवासात, कॉलेज कट्ट्यावर किंवा ऑफिसमध्ये जमतात.

अशाच गप्पांचे आधुनिक स्वरूप म्हणजे व्हॉट्सअॅप ग्रुपवरील संवाद. या गप्पांमध्ये लोक अनेकदा मतभेद करतात, पण त्याच वेळी काही वेळा त्या गप्पांतून उपयुक्त निष्कर्षही काढले जातात. एखाद्या मुद्द्यावर सर्व सहमत होतात, तर कधी मतविभाग होतो. अशा प्रत्यक्ष समोरासमोर बसून दिलेल्या विषयावर तर्कसंगत गप्पा मारण्याला कॉर्पोरेट जगतात 'ग्रुप डिस्कशन' म्हणून ओळखलं जातं. आज या कौशल्याला भरपूर महत्त्व दिलं जात आहे. ग्रुप डिस्कशन मधील कामगिरीवरून व्यक्तिमत्त्वाचे परीक्षण करून कंपन्या उमेदवारांची निवड करतात.

गप्पा मारणे हे एक कौशल्य आहे. जो व्यक्ती योग्य शब्दांचा वापर करून, युक्तिवादाने, कोणाच्याही भावना न दुखावता, प्रभावीपणे मुद्दे मांडतो, तो खरा संवादक – 'गप्पाड्या' – समजला जातो. हे कौशल्य वाचनाने, सरावाने आणि वैचारिक प्रगल्भता गाठल्याने प्राप्त होते. काही लोकांशी गप्पा मारायला आपल्याला विशेष आवडते, कारण त्यांचं बोलणं अर्थपूर्ण, दिलखुलास आणि विचारप्रवर्तक असतं. अशा लोकांची संगतही आपल्याला हवहवसी वाटते.

मेंदूच्या उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा म्हणजे भाषेचा उगम होय. माणसाला मिळालेलं ज्ञान पुढील पिढीकडे देण्याचं माध्यम म्हणजेच 'भाषा' आणि त्यातून घडणाऱ्या गप्पा. पूर्वजांच्या अनुभवातून पुढील पिढ्यांना समजलेली माहिती ˉ जसं की एखादा प्राणी हिंस्र आहे, एखादं फळ विषारी आहे, ऋतूचक्र, स्थल मार्ग, जल मार्ग ˉ ही सर्व माहिती पिढ्यान्पिढ्या संवादातून, गप्पांतून पुढे गेली. गप्पांमधून केवळ हसत-खेळत वेळ घालवला जात नव्हता, तर समाजरचना, नैतिकता, व्यवहार, संस्कार यांचाही पाया रचला जात होता. चांगल्या गोष्टीचं कौतुक करणं, चुकीवर टीका करणं, अनुभवांची देवाणघेवाण करणं ˉ हे सर्व गप्पांमधून घडत गेलं. समाजाचा चेहरामोहराही अशा संवादांमधून घडत गेला.

गप्पांची सुरुवात लाखो वर्षांपूर्वी झाली असली तरी, सुसंगत व विस्तृत संवाद शक्य होणं ही मानवी उत्क्रांतीतील एक क्रांतिकारक घटना होती. त्यामुळेच माणूस 'शिकणारा प्राणी' ठरला. चॅटिंगचा हा ऐतिहासिक,प्रवास आणि त्याचं आजचं स्वरूप आपल्याला शिकवतो की ˉ माणूस 'हाताची घडी तोंडावर बोट ठेवून' जगू शकत नाही. त्याच्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, संकल्पना यांना अभिव्यक्त करण्याची तीव्र गरज त्याला असते. आणि आज ही गरज चॅटिंगच्या विविध रूपांतून व्यक्त होत आहे.

## लोकसंख्या शिक्षण काळाची गरज



आज ११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षांपूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. दोन वर्षांपूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसारभारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही.

ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वांनाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## पाऊस सगळ्यांसाठीच रोमँटिक नसतो

पावसाच्या सरी ह्या सर्वांना सुखदायक असतात कारण, ऋतूंच्या चक्रानुसार तीव्र उन्हाळा संपला की, लगेच त्यांच्या पाठी पावसाळा ऋतू येतो. या पावसाळ्यात पावसाच्या सरींनी उष्णतेची दाहकता कमी होते. नद्या नाले तुडुंब भरून वाहतात. काळ्याभोर शेतीमध्ये हिरवीगार पिके डोलताना दिसून येतात. पानगळ झालेल्या वृक्षांना छान पालवी फुटून हिरवीगार होताना दिसून येते. तलाव तुडुंब भरल्यामुळे गुरेढोरे वासरांना व वन्यप्राण्यांना पिण्यास पाणी मिळते. डोंगर माथ्यावरून मनमोहक धबधबे वाहतात. सर्वांना प्रसन्न करणारा हा वर्षा ऋतू मनाला आनंदी करतो उत्साही करतो. शेतकरी राजासाठी पाऊस म्हणजे वरदानच असते. तो सदैव पावसांच्या सरींमध्ये भिजतो. ओला होतो. वावराकडील नदी, नाले डोंगरांच्या पायथ्याशी वास्तव्य करणारे शेतकरी सदैव हे नयनरूम दृश्य डोळ्यांनी बघतात. त्यांचे यांना नवल असतेच यात शंका नाही. मात्र, दररोजच्या अशा जीवनाचे त्यांना फारसं कौतुक नसते

या सिमेंटच्या वस्तीत राहणारे मात्र या मनमोहक गोष्टींपासून वंचित असतात. कारण ते फक्त सिमेंटच्या बंगल्यातून खिडकीच्या तावदनातून पावसाच्या त्याच त्या सरी बघतात व निसर्गात होणारा बदल व मात्र प्रत्यक्ष पावसाच्या सरीत भिजून ओले होण्याचा आनंद त्यांना मिळणार कुठून?

पावसाच्या सरींचा आनंद घेण्यासाठी ही सिमेंटच्या जंगलातील म्हणजेच शहरी भागातील मंडळी वर्षा सहलीच्यानिमित्ताने घराबाहेर पडतात. कुठेतरी निसर्गरम्य ठिकाणी ते नयनरम्य दृश्य बघण्यासाठी जातात. शेती, डोंगर दऱ्या, नदी कडे जाऊन तेथील धबधब्यात कोसळणाऱ्या पाण्यात भिजतात. नद्या, नाले, तलावात डुबक्या मारतात कारण त्यांच्यासाठी हा क्षण काही काळांसाठीच असतो. एखाद्या किल्ल्यांची सर करताना तेथील पायथ्याशी असणाऱ्या खेड्यातील वस्तीतील लोकांसमवेत काही काळ घालवता. तेथे छान चुलीवरील गरमागरम चहा घेतात गरम गरम भजी खाऊन गावाकडील चुलीवरील जेवण करतात. तेथील निसर्गरम्य वातावरणाचे भ्रमणध्वनी मध्ये छायाचित्र कैद करतात.काहीजण स्वयं छायाचित्र (सेल्फी) काढतात. त्या वातावरणामध्ये रममान होतात. काही तरुण महाशय मद्यप्राशन करून कोसळणाऱ्या धबधब्यांमध्ये आनंद व्यक्त करतात. काही जीवघेण्या ठिकाणी वेडे धाडस करून प्राणही गमावतात. कारण त्यांना वेगळेपणा हवा असतो. त्यांना आनंद हवा असतो. कधी न बघितलेले दृश्य ते एकाच दिवशी अधाशासारखे बघण्याचा प्रयत्न करतात.हा पाऊस म्हणजेच पर्यटक



मंडळीसाठी रोमांटिक असतो, कारण हे क्षण त्यांच्या आयुष्यात दुर्मिळ असतात.

पावसांच्या बरसणाऱ्या सरी निश्चितच अल्हाददायक वातावरणमुळे हव्याहव्याश्या वाटतात परंतु, सगळ्यांसाठीच हा पाऊस रोमँटिक नसतो. असंच मी जेव्हा एका सत्तरीतील बाबांकडे उन्हाळ्यात चपलीचा अंगठा शिवण्यासाठी गेलो होतो. तेव्हा मात्र बाबा उघड्यावर रस्त्याच्या कडेला उन्हाळ्याच्या संरक्षणासाठी एका छत्री लावून छोट दुकान चालवत होते व उन्हाच्या दिशेने छत्रीला फिरवून काम करत होते. पावसाळ्यात रस्त्याने जात वेळेस तेच बाबा अचानक दिसले. पावसांच्या सरी चालू झाल्या. त्यांनी छोट्याखानी मांडलेल्या दुकानावर पावसांच्या सरी बरसत होत्या. रस्त्याने पाणी वाहायला लागले. ते त्या वस्तू जमा करण्याचा भर पावसात केविलवाना प्रयत्न करत होते. ते सर्व घेऊन पिंपळाच्या झाडाच्या आसऱ्याला गेले. तेथेही पावसाचे टपोरे थेंब पडत होते. पावसाने सत्तरीतील शरीर गारव्याने कुडकुडत होते. मात्र सर्व जीव त्यांचा वस्तूंमध्ये अडकलेला होता. म्हणून मेन कापडाने व पोतड्याच्या फटीने झाकत होते. खरंच!हा पाऊस त्यांच्यासाठी रोमँटिक असतो का हो? किती विषमता असते ना..! खरच ! आनंद लुटण्याच्या नांदात कुणी हजारो रुपये खर्च करून डोंगरदऱ्या व धबधब्या पाहण्यासाठी केवळ ओलचिंब होण्यासाठी पावसाचा आनंद घेतो, तर काही ठिकाणी हे विदारिक चित्र...!

खेड्यापाड्यातील,आदिवासी लोकवस्तीतील लोक नक्कीच पावसाच्या सरींनी परमेश्वराला प्रार्थना करत असतील कारण त्यावर त्यांचे भविष्य असतं. मात्र गावाकडील टीन पत्रांचे घर, वाड्या वस्तीतील लोकांच्या झोपड्या या धो धो बरसणाऱ्या पावसात काय तग धरत असतील. छप्पर, टीन-पत्र जुने होऊन किती तरी ठिकाणी गळतात. त्या गळणाऱ्या ठिकाणी घरातील भांडे जसे की, ग्लास, पातेलं, टोपलं ठेवतात. भरलं की, साचलेलं पाणी परत-परत फेकतात. ही कसरत तासंतास सुरू झालेल्या पावसापासून सुरू होते तर पाऊस ओसरेपर्यंत...! मातीच्या भिंती ओलावा धरून ठेवतात. गार वातावरण पसरते. झोपड्या तर जागोजागी कळतात. त्या गळणाऱ्या झोपडीतून हाताच्या पसाने माय माऊली सह घरातील लेकरं बाळ पाणी झोपडीच्या बाहेर फेकतात. बापमाणूस भर पावसात घोंगटा घेऊन पाणी गळणाऱ्या ठिकाणी ताडपत्री, फट लावून पाणी थोपवन्याच्या केविलवाणा प्रयत्न करतो. अहो!एवढेच काय घरात बसायला जागा राहत नाही म्हणून, पोतड्या, पोती, लाकडी फळी, पाट टाकून त्यावर बसतात. मात्र, ह्या दुःखाचा आनंद घेत असतात. कुठल्याही प्रकारची तक्रार न करता. स्वयंपाकासाठी आणलेलं सरपण पाण्याने ओलं झाल्यामुळे चुली पेटत नाहीत. ओल्या लाकडातून निघणारं धूपट घरभर पसरतो. डोळ्यातून पावसांच्या सरी प्रमाणे अश्रूंच्या धारा कोसळतात.वीज गायब होते. दिवा, कंदील लावून तरीही माय माऊली स्वयंपाक करते व लेकरंबाळ अन धन्याला पोटभर खाऊ घालते. सांगा ना..! हा पाऊस त्यांच्यासाठी रोमँटिक कसा असू शकेल?

आठवड्याभराचा खर्च भागवण्यासाठी शेतातील भाजीपाला विकण्यासाठी येणारा शेतकरी भाजीपाला घेऊन बाजारात बसतो. तेव्हा ह्या पावसाच्या सरी बरसल्यावर त्याची उडणारी धांदल बघितली तर नक्कीच डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहत नाही. विक्रीसाठी आणलेला भाजीपाला, रस्त्याच्या कडेनं वाहणारं पाणी, तो झाकण्यासाठी केलेला त्यांचा केविलवाना प्रयत्न हा हृदय हेलावून टाकतो. जर धो-धो बरसणाऱ्या पावसामुळे खरेदीसाठी कोणी गिऱ्हाईक आलं नाही तर, तो न विकलेला माल परत टोपलं, पोतडी, गोणी मध्ये भरून डोक्यावर घेऊन आणताना जीवाची घालमेल होते ती वेगळीच...! काही ठिकाणी गावे जोडण्यासाठी रस्ते नाही. पूल नाही.त्या ठिकाणी शाळकरी मुलं, कामगार वर्ग यांची ये-जा करण्यासाठी तारांबळ उडताना दिसून येते. एकमेकांना सहारा देत, दोरीच्या साह्याने किंवा एखाद्या झाडाच्या फांदीच्या साह्याने रस्ता पूल ओलांडण्याचा प्रयत्न करतात. चिमुरडे म्हातारे-कोतारे महिला-पुरुष हे जीव धोक्यात टाकून पार करत असतात. एवढेच काय, काही ठिकाणी तर एवढे हृदयस्पर्शी चित्र दिसते की, गर्भवती महिलेला खेड्या-भागातून शहराच्या ठिकाणी दवाखान्यात नेण्यासाठी तिला अक्षरशः लुगड्याच्या किंवा धोतराच्या झोळीमध्ये टाकून, ४ व्यक्ती खांद्यावर घेऊन जाताना दिसतात.भर पावसात असे हृदय पिळवटून टाकणारे चित्र मन अस्वस्थ करते. मग सांगा..! हा पडणारा पाऊस सगळ्यांसाठीच रोमँटिक असतो का हो! त्याचप्रमाणे कामगार वर्ग कामावर जात असताना त्यांची उडणारी धांदल हीसुद्धा खरंच खूप हृदयस्पर्शी असते. पुणे मुंबई सारख्या ठिकाणी महिला पुरुष कामावर जाताना दिसतात. तसेच नगर उपनगरातील कर्मचारी वर्ग कामावर जाताना सायकल, दुचाकी अथवा शासकीय वाहनातून जातात, त्यांची कामावर वेळेवर पोहोचण्यासाठी होणारी धांदल उडतांना दिसून येते. म्हणून हा बरसणारा पाऊस वर्षा सहलीसाठी पर्यटक म्हणून गेलेल्या मज्जा, आनंद लुटणाऱ्या मंडळी सारखा सगळ्यांसाठीच रोमँटिक नसतो.

अशाप्रकारे हा बरसणारा पाऊस सर्वांसाठी आनंददायी सुखदायक असला तरी मात्र, जगण्यासाठी धडपड करणाऱ्या गोरगरीब, कामगार तथा खेड्यातील छोटे-मोठे उद्योग व्यवसाय करणाऱ्या, हातगाडी गाडी व लोटगाड्यांवर व्यवसाय करून पोटाची खळगी भरण्यासाठी, जीवाचं रान करणाऱ्या गरिबांसाठी हा रोमँटिक नसतोच मुळी..! त्याचबरोबर रस्त्याच्या कडेला लावलेले छोटे-मोठे उद्योगधंदे करणाऱ्यांसाठी हा बरसणारा पाऊस रोमँटिक नसतो. तरही भर पावसातही त्यांची जीवन जगण्यासाठी धडपड दिसून येते. या कष्टमय जीवनात सुद्धा ते आनंद शोधतात व कुठलीही तक्रार न करता. आशेवर जगत असतात.

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## फेक न्यूज..

खोडसाळ महाभाग
फेक न्यूज फेकतात
वाटे केले महा कार्य
नभास हातटेकतात

पत्र कारिता विशुद्ध
स लाभार्थ विकतात
कुबुद्धि शक्ती पुढती
कंबरेमधून वाकतात

प्रसिद्धीसाठीहव्यास
मन मळभ ओकतात
ब्रेकिंग न्यूज मसाला
मना येई ते ठोकतात

उथळ तो शहाणपणा
अल्पबुध्दी झाकतात
ब्रह्मास्त्र मुळीपेलवेना
हताश शस्त्रे टाकतात

अल्प फायदा मलिदा
सच्चिदानंदा मुकतात
पट्टीबांधली डोळ्यांस
पदोपदो पथचुकतात

जवळ जरी सुधाकुंभ
कोरडी तळे राखतात
सोडे आपले नंदनवन
शिळी फळे चाखतात

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी



This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कामगार मंत्री फुंडकर यांच्या उपस्थितीत माथाडी व सुरक्षारक्षक कायदा बचाव समितीची बैठक



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०९, मुंबई :** सह्याद्री अतिथी ग्रह मुंबई येथे माथाडी व सुरक्षारक्षक कामगारांच्या हिता संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. या प्रश्नांवर मा. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी माथाडी व सुरक्षारक्षक कामगार बचाव कृती समितीची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये प्रधान सचिव. कामगार आयुक्त. साहित्य मंडळाचे उपसचिव सुरक्षारक्षक मंडळाचे अध्यक्ष अशोक डोके माथाडी कामगारांचे नेते नरेंद्र पाटील तसेच सुरक्षारक्षक युनियनचे लक्ष्मणराव भोसले अजिंक्य भोसले सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे उपस्थित होते. यावेळी बैठकीमध्ये कामगार कायदा विधेयक मध्ये केलेले बदल सुधारणा, माथाडी संरक्षण कायदा. मजबुतीकरण. माथाडी कंपनी मध्ये यांत्रिकीकरण झाले असले तरीही माथाडी कामगारांची संख्या असणे अनिवार्य, माथाडी ऍक्टसाठी कमी शब्दात सूचना, माथाडी कामगारांच्या जागी त्यांच्या कुटुंबातील सदस्य त्याच जागेवर लागण्यासाठी प्रयत्न अशा विविध गोष्टींवर चर्चा झाली.माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी अधिवेशनाच्या निमित्ताने आवाज उठवला होता. सरकार दरबारी माथाडी कामगारांचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी मी कटिबद्ध असणार आहे. असे कामगार मंत्री फ ुडकर साहेबांनी सांगितले.

## भानेगाव येथील साई मंदिरात गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** श्री साई मंदिर व हनुमान मंदिर पंच कमिटीच्यावतीने भानेगाव येथील श्री साई मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव १० जुलै गुरुवारला मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त श्री साई मंदिरात पहाटे काकड आरती, श्री साईचे मंगल स्नान, अभिषेक, आरती आदी कार्यक्रम पार पडले. सकाळी ११ वाजता श्री साईबाबा पालखी प्रभातफेरीला सुरुवात करण्यात आली. यावेळी भजन मंडळ व दिंड्या सामील झाल्या होत्या. शोभायात्रा हनुमान मंदिर, श्याम बाबा मंदिर, उपासे ले आऊट भानेगाव परिसरातून भ्रमण केल्यानंतर श्री साई मंदिरात समारोप करण्यात आला. दुपारी मध्यान्ह आरती व दही काल्याचे कीर्तन पार पडल्यानंतर महाप्रसाद वितरण करण्यात आला. यावेळी शेकडो भाविक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्री साई मंदिर व हनुमान मंदिर पंच कमिटीचे अध्यक्ष डोमा निखाडे, श्यामराव सरोदे, रविंद्र चिखले, निळकंठ शिंदूरकर, रामेश्वर ढोके, क्रिष्णा चिकनकर, सुनील जालंदर, बापू शिंदूरकर, नामदेव ढोके, शंकर बोढे, नितीन मोहिते, राजू येलमुले, अरुण निखाडे, दीपक शिंदूरकर, अंकुश ढोके, सतीश शिंदूरकर, नंदकिशोर डोंगरे, राजेंद्र ढोके, प्रविण साबळे, देवराव शिंदूरकर, शांता चिखले, इंदू चिकनकर, मंदा निखाडे, सुशिला बेंबारे, सुशिला सरोदे, अर्चना चिकनकर, बेबी निखाडे, मनिषा येलमुले, रेखा पापडकर, बंडू शिंदूरकर, विशाल निखाडे, महेंद्र चटप, अनिकेत शिंदूरकर, चेतन चिकनकर, मोहन शिंदूरकर, मानव गारघाटे, संजय मस्कर, पारस चिकनकर, संकेत पापडकर, तन्मय ढोके आदिनी सहकार्य केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त मातोश्रीवर शिवसेना प्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांना मशाल भेट



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, मुंबई :** गुरुपौर्णिमेच्या पवित्र आणि प्रेरणादायी दिवशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख माननीय उद्धवसाहेब ठाकरे यांची भेट घेण्याचा सन्मान आज मातोशी निवासस्थानी मिळाला. या प्रसंगी डोंबिवली विधानसभा संपर्कप्रमुख प्रकाश वाणी यांनी उद्धवसाहेबांना संघर्षाची, शक्तीची आणि मार्गदर्शनाची प्रतीक असलेली मशाल भेट म्हणून अर्पण केली.

ही मशाल केवळ एक भेटवस्तू नसून, ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली पेटलेल्या लढ्याच्या आणि असंख्य कार्यकर्त्यांच्या श्रद्धेच्या ज्वाळेचे प्रतीक आहे. या भेटीदरम्यान कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत आणि कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे हे मान्यवर देखील उपस्थित होते.

गुरुपौर्णिमा ही गुरुंच्या साक्षीने प्रेरणा घेण्याचा दिवस असतो. उद्धवसाहेब हे आमच्या राजकीय जीवनातील दीपस्तंभ असून त्यांचं विचारसरणी, संयम, आणि संघर्षाचा वारसा आम्हा सर्व कार्यकर्त्यांना नेहमीच मार्गदर्शन करत राहतो.

आज मातोशीवरची ही भेट ही आमच्यासाठी एक नवा उत्साह, नवी ऊर्जा आणि नव्या लढ्याची सुरुवात ठरेल. पक्ष आणि विचारप्रवाहासाठी आमची निष्ठा ही मशालप्रमाणे अखंड तेजस्वी राहील, अशी हमी या दिवशी आम्ही पुनः एकदा घेतली. यावेळी कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख व उपनेते गुरुनाथ खोत कल्याण जिल्हा संघटक तात्यासाहेब माने कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे सदाशिव गायकर विधानसभा संघटक तालुका संघटक भगवान पाटील उपतालुकाप्रमुख परेश पाटील नवनीत गायकर आदी उपस्थित होते.

# खाजगीकरणाला वीज कर्मचारी संघटनाचा तीव्र विरोध

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** विद्युत कायदा २०२३ च्या संविधानिक तरतुदीला आडून व राज्य वीज नियामक आयोगाचा वापर करून केंद्र व राज्य शासन खाजगी करणासाठी पुढे सरसावले आहे. ग्राहक हिताचा खोटा पुडका दाखवून देशातील प्रथम आणि आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाच्या महावितरण कंपनीस नष्ट करण्याचे प्रयत्न महाराष्ट्र सरकारने सुरू केले आहे.




९ जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनात औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथील महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, सब ऑर्डिनेट इंजिनिअर असोसिएशन व मागासवर्गीय संघटना सहभागी झाल्या होत्या.

वीज उद्योगातील केंद्र व राज्य सरकारकडून होत असलेले खाजगीकरण, समांतर वीज परवाना, पुनर्रचना प्रस्ताव, पेन्शन यासह इतर मागण्यासाठी तिन्ही संघटनाचे सभासद व पदाधिकारी यांच्या वतीने दिवसभर धरणे आंदोलन आणि निदर्शने करण्यात आले.

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या धोरणाच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीने नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील भांडुप, मुलुंड, नवी मुंबई, पनवेल, खारघर, तळोजा आणि उरण येथे समांतर वीज परवाना मिळवण्यासाठी अर्ज सादर केला आहे. तर टोरेंट पॉवर कंपनीने नागपूर सह, वसई विरार, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर व ठाणे महानगरपालिका अंतर्गत वीज वितरण परवाना मिळण्याची मागणी केली आहे. शिवाय टाटा पॉवर कंपनीने छत्रपती संभाजी नगर, बदलापूर, जालना तालुका व वाळूज एमआयडीसीतील परवाना मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

सदर कंपन्यांना परवाने दिल्यास महावितरण कंपनीचे अस्तित्व नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. आधीच बिएसएनएल ने ५५ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर वेळ येणार यात शंका नाही. राज्य शासनाने २००१ साली आरक्षण कायदा तयार केला. सदर कायद्याच्या कलम २ मध्ये शासनाची जमीन, इन्फ्रास्ट्रक्चर सवलती घेणारे खाजगी कंपन्यांनाही आरक्षण कायदा लागू असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. महावितरण कंपनी ही राज्य शासनाच्या अखत्यारीत येत असल्याने तिला विक्रीस काढणे असंविधानिक असल्याचे वीज कामगारांचे म्हणणे आहे. त्यामूळे खाजगीकरणाचा डाव हाणून पाडण्यासाठी एक दिवसाचा संप पुकारल्याचे यावेळी वीज कामगार संघटनेच्या नेत्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य द्वारासमोर झालेल्या द्वार सभेत सहभागी संघटनांच्या पदाधिकारी व सभासदांना महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे केंद्रीय अध्यक्ष कॉ.मोहन शर्मा, सबऑर्डिनेट इंजिनिअर असोसिएशनचे सारंग देशमुख तसेच मागासवर्गीय संघटनेचे नरेंद्र ठवरे यांनी मार्गदर्शन केले. आंदोलनात तिन्ही संघटनांचे सभासद पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ...अन्यथा सुपा टोलनाका बंद पाडू - रविश रासकर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर - पुणे महामार्गावर अपघात हे नित्याचेच झाले आहेत. शासन व या महामार्गाची देखभाल दुरुस्ती करणारे टोलनाका प्रशासन कंपनी बघ्याची भूमिका घेत आहे. नगर- पुणे महामार्गावर असलेल्या टोलनाक्यावर अपघात घडल्यानंतर मदत करण्यासाठी कोणतीही सुविधा नाहीत. तेव्हा प्रशासनाने प्रवाशांना व वाहनचालकांना योग्य सुविधा न उपलब्ध केल्यास १५ दिवसानंतर सुपा टोलनाका बंद पाडू, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते रविश रासकर यांनी दिला.

मुदतीत रस्ता दुरुस्त न झाल्यास मृत्य पावणाऱ्या व्यक्तींची जबाबदारी संबंधित कंपनीवर ठेवून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोदवू असे रविश रासकर यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.

सद्यस्थितीत महामार्गाच्या कडेला व मुख्य रस्त्याच्या चौकामध्ये झेब्रा क्रॉसिंग व पांढरे पट्टे नाहीत. जातेगाव फाटा मुख्य चौकात पांढरे पट्टे मारण्याची वारंवार विनंती करूनही अद्यापही याकडे लक्ष दिले जात नाही. त्याच बरोबर अत्यंत गरजेचे असणारे दिशादर्शक व नामफलक लावले गेले नाहीत. सुपा टोलनाक्यावर इमर्जन्सी अँब्युलन्स, क्रेन या सुविधा उपलब्ध नाहीत. अनेक ठिकाणी निकृष्ट व अर्धवट कामे सोडल्याने वाहनचालकांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण केली आहे. सस्ता दुभाजकावर लावलेले फ्लेक्स व महामार्गाच्या कडेला उभे केलेल्या फ्लेक्स बोर्डकडे बांधकाम विभाग कायमस्वरूपी दुर्लक्ष करीत आला आहे. वाहनांचे लक्ष विचलित करणाऱ्या फ्लेक्सबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही. मुख्य रस्त्याच्या आतील अतिक्रमणांवर कारवाई केली जात नाही.

नगर-पुणे महामार्गावर १३ वर्षे टोल वसूल करणारी कंपनी मूलभूत व बंधनकारक सुविधा उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरली आहे. अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नगर- पुणे महामार्गावर जातेगाव फाटा येथे सतत अपघात, वाहतूक कोंडी होऊन शाळकरी मुले ज्येष्ठ नागरिकांचे अपघात झाले.

अनेक निरपराधांना जीव गमवावा लागला. अनेक निरपराध नागरिकांना अपंगत्व प्राप्त झाले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून संबंधित अधिकार्यांशी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप मनसेतर्फे करण्यात आला. संबंधित टोलनाका बंद केला नाही, तर १५ दिवसांनंतर अशाच प्रकारे पूर्वसूचना न देता सार्वजनिक बांधकाम विभाग व टोलनाका प्रशासनाच्या दालनात आंदोलन करणार असल्याचे रविश रासकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत सिंदूर पुलाचे लोकार्पण

## कर्नाकचा काळा इतिहास कायमचा पुसला...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, मुंबई :** मुंबईतील बहुचर्चित आणि बहू प्रतीक्षित अशा ऐतिहासिक कर्नाक पुलाचे म्हणजेच ऑपरेशन सिंदूर पुलाचे उदघाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईकरांना असलेली कर्नाक पुलाची प्रतीक्षा आता संपली असुन सिंदूर पुल असे या पुलाचे नामकरण देखील करण्यात आले आहे.



उदघाटन प्रसंगी पुलाचे नाव बदलण्यामागचं कारण सांगताना मुख्यमंत्र्यांनी कर्नाक नावाच्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या जुलमी आणि अत्याचारी वृत्तीचा उल्लेख केला. तसेच प्रबोधनकार ठाकरेंनी लिहिलेल्या इतिहासातील संदर्भ देखील त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

गेली दीडशे वर्ष या पुलाला क्रूर कर्मा कर्नाकच्या नावानेच ओळखले जात होते. भारतीयांवर अन्याय करणारा आणि स्वकीय जनतेला फसविणाऱ्या या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या इतिहासातील काळ्या खुणा कायमच्या पुसून टाकण्यासाठी या कर्नाक पुलाचे सिंदूर असे नामकरण केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

तसेच नुकतेच भारताने पाकिस्तान विरुद्ध राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरला समर्पित करत या उड्डाणपुलाचे नाव सिंदूर ठेवण्यात केल्याचेही त्यांनी सांगितले.

मध्य रेल्वेच्या मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डी' मेलो म ार्गाला जोडणाऱ्या या सिंदूर रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात इतिहासातील अशी काळी प्रकरणे संपली पाहिजेत, त्याच्या खुणा मिटल्या पाहिजेत असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याने कर्नाक पुलाचे नाव बदलले. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानात जाऊन दहशतवादी अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तानात घुसून दहशदवादी अड्डे उद्ध्वस्त करू शकतो, हे दाखवून दिले. या सेनेच्या अतुलनीय कामगिरीमुळे सर्वांच्या मते मनपाने पुलाला सिंदूर नाव दिले, याचा म ला आनंद आहे. या पुलाची एकूण लांबी ३४२ मीटर असून रेल्वेच्या हद्दीत ७० मीटर इतकी असल्याने निश्चितच मुंबईतल्या वाहतुकीसाठी पूल अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

रेल्वेवरचा पूल असल्याने आणि दाटीवाटीच्या अडचणीवर मात करून मुंबई मनपाने कमी वेळात ऐतिहासिक जुन्या कर्नाक पुलाचे उत्कृष्ट बांधकाम केल्याने मुख्यमंत्र्यांनी मनपाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. शिवाय सिंदूर पूल मुंबईकरांना समर्पित करीत दुपारी ३:०० वाजेपासून वाहतुकीला खुला होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी घोषित केले.

दक्षिण मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद बंदर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी सिंदूर पूल महत्त्वाचा आहे. मशीद बंदर परिसरात पूर्व आणि पश्चिम परिसर जोडणारा विद्यमान मार्ग कायम ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने या पुलाची पुनर्बांधणी केली आहे. म ध्य रेल्वे प्रशासनाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार सिंदूर पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे.

मुंबई शहराच्या दक्षिणेतील पी. डी' मेलो मार्गाकडील बंदर भाग आणि क्रॉफर्ड मार्केट, काळबादेवी, धोबी तलाव या वाणिज्यक भागांना लोहमार्गावरून पूर्व-पश्चिमेला जोडणारा महत्त्वाचा दुवा. पुलाच्या पुनर्बांधणीमुळे सुमारे १० वर्षापासून बाधित झालेली पूर्व-पश्चिम वाहतुकीसाठी सुविधा उपलब्ध होणार. पूल कार्यान्वित झाल्यावर पी डी' मेलो मार्ग विशेषतः वालचंद हिराचंद मार्ग व शहीद भगतसिंग मार्ग यांच्या छेदनबिंदूवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. पुलाच्या पुनर्बांधणीने युसुफ मेहरअली म ार्ग, मोहम्मद अली मार्ग, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, काझी सय्यद मार्ग यावरील वाहतूक सुलभ होणार आहे.

# गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता; पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला. या जयघोषात अवघी श्रीकृष्ण नगरी म्हणजेच गोपाळपूर नगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्वर माऊली, तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला. गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी गुरुपोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे ५ वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले. तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे ४ वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे ४५० संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या. सकाळी ९ च्या सुमारास जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर १० च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले.

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिंड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले. तत्पुर्वी गोपाळपुर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे २.३० वाजता विश्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे ३.३० वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

भाविकांनी मोठ्या श्ध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले.

गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच उज्वला बनसोडे, ग्रामसेविका ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी पालख्यांचे व दिड्यांचे स्वागत केले. गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छ पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, प्लॅस्टिक संकलन केंद्र, तात्पुरते शौचालय, निवारा शेड, आरोग्य कक्ष आदी सुविधा वारकरी भाविकांसाठी उपलब्ध केल्या होत्या. यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने ही चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.या सोहळ्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारेयांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. गोपाळपूर येथील गोपाळ कृष्ण मंदीर समितीच्या वतीने मंदिरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार गोपाळ कृष्ण मंदिर समितीच्या वतीने गोपाळ कृष्ण मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप गुरव यांच्या हस्ते करण्यात आला.



**दिनांक १६ जुलै रोजी प्रक्षाळ पूजा**

पंढरपूर येथील आषाढी यात्रेत भाविकांना दर्शन देण्यासाठी श्री विठ्ठल- रुक्मिणीमाता अहोरात्र उभे असतात. या कालावधीत देवाचे नित्योपचार बंद असतात. श्री विठ्ठलाचे नवरात्र असल्याने पलंग काढण्यात आलेला असतो. त्यामुळे बुधवार, दिनांक १६ जुलै २०२५ रोजी श्रींची प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

### संत-देव भेटीचा सोहळा

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्या व सर्व संताच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या. यावेळी देवाची आणि संताची अनुपम भेट घडवून आणण्यात आली. श्री विठ्ठल - रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यावर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला. यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या. तत्पूर्वी सकाळी ६ वाजता श्री.संत एकनाथ महाराजांच्या दिंडीचा काला संपन्न झाला.

त्यानंतर श्री.संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, श्री.संत चांगावटेश्वर देवस्थान सासवड, श्री.संत सोपानदेव महाराज संस्थान सासवड, श्री. संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर, श्री. संत निळोबाराय संस्थान पिंपळनेर, श्री. विठ्ठल रूख्माई संस्थान कौंडण्यपूर, श्री. संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, श्री.संत नामदेव महाराज संस्थान पंढरपूर या संतांचा देव भेटीचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पाडला.

मंदिर समितीच्या वतीने पादुकांचे पूजन व मानाच्या पालख्यांचे मानकरी यांचे उपरणे,श्रीफळ व हार देऊन सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ तसेच मानाचे पालख्यांचे पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त उपस्थित होते.

**जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता ।। म्हणत जड अंत:करणाने संताच्या पालख्यांनी व वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.**

# टाकळीढोकेश्वर येथे राज्यातील अधिकाऱ्यांचा अभ्यास दौरा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे यांच्या राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत शाश्वत विकास सुप्रशासनयुक्त गाव प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या दरम्यान पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर या आदर्श गावी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा ५ दिवसांच्या निवासी अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. अभ्यास दौऱ्यात यशदा संस्थेचे व राज्यातील ६ प्रशिक्षणार्थी अधिकारी सहभागी झाले होते.

अधिकाऱ्यांनी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बचतगट, ग्रामीण रुग्णालय, श्री.ढोकेश्वर विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय, तलाठी कार्यालय, स्वस्त धान्य दुकान, अंगणवाडी, कृषी विभाग कार्यालय, देवस्थान आदी विविध विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेऊन ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध प्रकल्पांबाबत तसेच



शाळेच्या शिक्षिकांचे व विद्यार्थ्यांचे देखील कौतुक केले. पिण्याचे पाणी, घनकचरा, सांडपाणी यांचे व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते, आरोग्य सुविधा, वृक्षारोपण व संवर्धन, आम्ही टाकळी जलशुद्धीकरण प्रकल्प अन्य विविध विकासकामे, तसेच ग्रामपंचायतीचे

दैनंदिन कामकाज याबाबतची माहिती सरपंच अरुणा खिलारी व ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट यांनी अधिकाऱ्यांना दिली. सरपंच अरुणा खिलारी यांचेकडून महिला बचत गट व ग्रामसंघ यांच्या कार्याची माहिती घेण्यात आली. ग्रामपंचायतीचे संगणीकरण व ऑनलाइन कामाची माहिती लिपिक लखन आल्हाट यांनी दिली.

तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पक्षी उद्यान, औषधी वनस्पती उद्यान, परसबाग, ग्रंथालय, मध्यान्ह भोजन कक्ष, बालोद्यान वापराविषयीची माहिती मुख्याध्यापक ठुबे यांच्याकडून घेतली. तालुक्याच्या उत्तरेकडील गाव, त्यात प्रतिकूल परिस्थिती असूनही केवळ शैक्षणिक क्षेत्रातील गावाचे नाव देशाच्या नकाशावर झळकत आहे. अशा प्रतिक्रिया अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी परिविक्षाधीन अधिकारी शीतल घोलप (उपजिल्हाधिकारी), रुपा मोहितकर (बाल विकास प्रकल्प अधिकारी), सागर वाघमारे (तहसीलदार), गौरव बंग (सहाय्यक राज्य कर आयुक्त), अनिल काळे (सहाय्यक राज्य कर आयुक्त), प्रेरक उजगरे (शिक्षणधिकारी) व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ.दाते यांनी पारनेरमधील समस्यांचा वाचला पाढा !

## तालुक्यातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभेत लक्षवेधी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली कायदा व सुव्यवस्थेची समस्या, अमली पदार्थांचे गावागावांत निर्माण होऊ पाहणारे जाळे आणि पारनेर मतदारसंघातील वाळुंबा नदीला आलेल्या पूरस्थितीत पोलिसांनी दाखविलेली तत्परता या मुद्द्यांवर विधानसभेत आमदार काशिनाथ दाते यांनी जोरदार भाष्य करत सरकारचे लक्ष वेधले.

पुरवणी मागणी चर्चेदरम्यान गृह विभागावर बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पारनेर तालुक्यात काही भागांमध्ये अगदी पानांच्या टपऱ्यांवरसुद्धा अमली पदार्थांची विक्री सुरू असून, युवकांचे भविष्य अंधारात ढकलले जात आहे. या विक्रीवर तातडीने बंदी घालण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

यासोबतच टाकळी ढोकेश्वर येथे नवीन पोलिस ठाणे अद्यावत इमारतीसह तिथे लागणारे कर्मचारी नियुक्त होऊन पोलिस स्टेशन तात्काळ सुरू करण्याची ठाम मागणी आ.दाते यांनी केली.

तसेच या भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतातील वीजपंप, कनेक्शनसाठी वापरण्यात येणाऱ्या केबल तसेच शेळ्या, मेंढ्यांच्या चोऱ्यांचे प्रमाणही वाढले असून या भागाचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि सध्या टाकळी ढोकेश्वर बीटमध्ये उपलब्ध असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करता, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हे ठाणे कार्यरत होणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यांच्या या ठाम आणि मुद्देसूद मागण्यांनी पारनेर तालुक्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी त्यांनी घेतलेली भूमिका अधोरेखित होत असून आमदार काशिनाथ दाते यांनी या संपूर्ण पावसाळी अधिवेशनातच मतदारसंघातील जनतेच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत प्रशासनाचे लक्ष वेधल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



पावसामुळे अलीकडेच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील खडकी, खंडाळा या भागांमध्ये पूरसदृश्य परीस्थिती निर्माण झालेली असताना आठ नागरिक पुराच्या पाण्यात अडकलेले होते. पुराच्या रौद्रतेमुळे सगळेच भयभीत झालेले असताना एपीआय प्रल्हाद गिते यांनी जीवाची पर्वा न करता पूरग्रस्त नागरिकांचे प्राण वाचले, त्यांच्या या धाडसाचे कौतुक होऊन, सरकारी पातळीवर त्यांचा गौरव करण्यात यावा.

**- आमदार, काशिनाथ दाते**

# थोडक्यात

## बोरीत बेंदूर सणा निमित्त उद्यान दुतांकडून नंदी सजावट स्पर्धा



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय फलटणच्या सातव्या सत्रातील उद्यान दूतांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत बोरी येथे दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी ४ वाजता उद्यान दूतांनी महाराष्ट्रीय बेंदूर सणाचे औचित्य साधून नंदी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी बैलांच्या मिरवणूकीचे आयोजन केले.या प्रसंगी सर्व बोरी ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते. आकर्षक सजावट असलेल्या बैलांचा व मालकांचा उद्यानदुतांकडून बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. शेतकरी शेतात आपला घाम गाळत काळ्या मातीत पिक फुलवतो.कष्टाने फुलवलेल्या या शेतीमध्ये विविध अवजारांसह बैलाचं देखील मोलाचं योगदान असतं हे शेतकऱ्यांना उद्यान दूतांनी पटवून दिले व हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. या उपक्रमासाठी श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी.चव्हाण, कार्यक्रम अधिकारी, डॉ.जे.व्ही. लेंभे, प्रा.डॉ.ए.के.अभंगराव व समन्वयक प्रा.ए. डी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यानदूत माने आकाश, भोईटे रविराज, रानभरे पार्थ, अभंग सनी, बर्गे रुपेश यांनी हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

## महाराष्ट्राचे ७ खेळाडू एन.आय.एस. परीक्षा उत्तीर्ण



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.१०, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** भारतीय क्रीडा मंत्रालय व भारतीय क्रीडा प्राधिकरण, नेताजी सुभाष इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट पतियाळा (पंजाब) यांच्या विद्यमाने भारतातील २०० क्रीडा प्रशिक्षकांची छ्खड क्रीडा प्रशिक्षक/मार्गदर्शक कोर्ससाठी निवड करण्यात आली होती. यादरम्यान घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून प्रा.रोहन रंधवे (अहिल्यानगर), सतीश गवळी(नाशिक), प्रा.सोमनाथ हरणावळ (पुणे), समीर देशमुख (अमरावती), प्रा.इरफान खान (अमरावती), शिवांजली शिंदे (सातारा), प्रा.दिव्या शीलवंत (अहिल्यानगर) अश्रेणीत छ्खड परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## कुकडी कालव्यावरील पूल बांधणीला जलसंपदा मंत्र्यांचा हिरवा कंदील

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील कुकडी डावा कालव्यावरील पुलांच्या कामांस मंजुरी देण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व कुकडी कालवा सल्लागार समितीचे सदस्य सुजित झावरे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यास यामुळे यश आले आहे. पारनेर तालुक्याच्या दक्षिण भागातील १६-१७ गावांना समृद्धीच्या मार्गावर नेणाऱ्या कुकडी डाव्या कालव्यातून सिंचन सुविधा मिळत असली, तरी या कालव्यावर आवश्यक पायाभूत सुविधा नसल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कालव्यावर पूल नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या वस्तीवरून शेतामध्ये जाण्यासाठी ७ ते ८ किलोमीटरचा वळसा घालावा लागतो, ही बाब विशेषतः पिंपळनेर, म्हसे, जवळा, नारायणगव्हाण, वडगाव गुंड, निघोज, अळकुटी परिसरातील शेतकऱ्यांसाठी गंभीर बनली आहे. या प्रश्नाची गंभीर दखल माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व कुकडी कालवा सल्लागार समितीचे सदस्य सुजित झावरे पाटील यांनी घेत मुंबई येथे जलसंपदा मंत्री व राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. त्यांनी कालवा क्षेत्रातील विविध गावांमध्ये पूल व इतर पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र निधी मंजूर करून कामे हाती घेण्याबाबतचे सविस्तर निवेदन जलसंपदा मंत्री विखे पाटील यांना सादर केले. सुजित झावरे पाटील यांनी या निवेदनात स्पष्टपणे मांडले की, कालव्यातून पाणी आल्यानंतर बागायती क्षेत्रात वाढ झाली असली तरी मूलभूत सोयीअभावी शेतकरी त्रस्त आहेत. त्यांच्या शेतातील पोच रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवणं ही काळाची गरज आहे.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या निवेदनाची गांभीर्याने दखल घेतली असून, त्यांनी तत्काळ जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावून आवश्यक त्या सर्व पूल प्रकल्पांना मंजुरी देण्याचे निर्देश दिले आहेत.



## का.निर्मलाबाई किशनराव कांबळे यांचे निधन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील अशोकानगर येथील रहिवासी का. निर्मलाबाई किशनराव कांबळे यांचे गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी सकाळी ५ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.



मृत्यू समयी त्यांचे वय (६८) वर्ष होते. त्यांचा अंत्यविधी भिमनगर येथील बौद्ध स्मशानभुमि येथे दि.१० जुलै रोजी दुपारी ४ वाजता करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुलं २ मुली नातवंड असा मोठा परिवार आहे. अरविंद कांबळे, रविंद्र कांबळे, प्रविण कांबळे यांच्या त्या मातोश्री होत.